अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । शुक्रवार, दि.१७ मे २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २२७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# जळणारी बाग न पहावल्याने दीड एकराच्या बागेवर कुऱ्हाड

✔ सुराज्य/सोलापूर

**नीरा कालव्याला फलटण भागात सुरू असलेली गळतीचे काम करण्यासाठी कालव्याचे आवर्तन बंद केले आहे. त्यामुळे नजरेसमोर जळत असणारी बाग पाहून संतापलेल्या शेतकऱ्याने दीड एकर द्राक्ष बाग कुऱ्हाड चालवून तोडून टाकली. कासेगाव परिसरातील या घटनेने शेतकऱ्यांची आगतिकता तीव्रपणे पुढे आली आहे.**

सोलापूर जिल्ह्यात सध्या दुष्काळाची भीषण छाया ठिकठिकाणी दिसत आहे. हातातील पीक जपण्यासाठी शेतकरी वाटेल ते प्रयत्न करत आहेत. अशातच नीरा उजवा कालव्याचे सुरु झालेले पाणी अचानक बंद झाल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्याने आपल्या दीड एकर द्राक्ष बागेवर कुऱ्हाड चालवून बाग तोडून टाकली. नीरा उजवा कालव्यात फलटण भागात गळती झाल्याने सुरु असलेले पाण्याचे आवर्तन बंद करण्यात आले.

दुरुस्तीनंतर पुन्हा आवर्तन देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगूनही द्राक्ष बाग जळू लागल्याचेही शेतकऱ्याच्या निदर्शनास आले. दरम्यान,



नुकसान होत असलेले पाहून वैतागलेल्या कासेगाव येथील शेतकऱ्याने आपल्या बागेवर कुऱ्हाड चालवत दीड एकर द्राक्ष बाग तोडून टाकली. समाधान ढोणे असे नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे नाव आहे. उजनी धरणात सध्या केवळ मायनस ४४ टक्के म्हणजेच ३७.७१ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. पाणीसाठ्यात २० मे पर्यंत मोठी घट होईल, अशी माहितीही समोर आली आहे.

मान्सून सुरु झाल्यानंतर म्हणजेच जूनमध्ये उजनी धरणात पाऊस सुरु झाला नाही तर पाण्याची परिस्थिती चिंताजनक होण्याची शक्यता आहे.

### भाटघरचे पाणी आले असते तर...

सध्या प्यायलाही पाणी नाही, अशावेळी भाटघरचे पाणी आले असते तर आपल्याला ही बाग तोडायची वेळ आली नसती असे समाधान ढोणे यांनी सांगितले. आता यातून जागेवर येण्यास पाच वर्षे जाणार असून या बागेसाठी सात ते आठ लाखांचा खर्च केला होता, असेही ढोणे यांनी सांगितले .

### पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांना वेळेवर पाणी द्यावे

अगदी गरजेची वेळ असताना पाण्याची वाट पाहत कासेगाव भागातील शेतकरी वाट पाहत होते. अगदी या पाण्यासाठी गावात गेल्या ३ दिवसापासून आमरण उपोषण सुरु झाले आहे. दुष्काळाची दाहकता अजून वाढत जात असताना पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांना वेळेवर पाणी द्यावे, अशी मागणी शेतकरी करू लागले आहेत.

युवकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी

# डॉ.नवीन तोतलांवर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

**आळंद तालुक्यातील युवकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी डॉ. नवीन सुभाष तोतला (रा. तोतला मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, सोलापूर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, डॉ. नवीन तोतला फरार झाल्याचे वृत्त आहे. त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र तो होऊ शकला नाही.**

या प्रकरणी मृत जिलानी हुसेनसाब केन्नीवाले (वय १७) याची आई रहिमतबी हुसेनसाब केन्नीवाले (वय ५० रा. आळंद जि. गुलबर्गा) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिलानी दोन वर्षापुर्वी ॲसीड प्यायला होता. त्यामुळे त्याला उपचारासाठी अग्रवाल नर्सिंग होम, सोलापूर येथे उपचारासाठी दाखल केले होते. या हॉस्पिटलमधील डॉ. नवीन तोतला हे त्याच्यावर उपचार करित होते. तेथे उपचार घेतल्यानंतर जिलानी या मुलाची तब्बेत सुधारली होती. त्यानंतर जिलानी याला अग्रवाल नर्सिंग होम मधील डॉक्टरांनी डिस्चार्ज दिला. त्यानंतर रहिमतबी यांनी मुलगा जिलानी याला घरी नेले.



त्यानंतर दि. २३ ऑगस्ट २०२२ रोजी रहिमतबी व त्यांचा मुलगा जिलानी हे १५ दिवसांनी डॉ. अग्रवाल नर्सिंग होम येथे चेक करण्यासाठी आले. त्यावेळी डॉ. अग्रवाल यांनी, तुम्ही डॉ. तोतला यांच्याकडे जावा. तेच उपचार करतील, असे सांगितले. त्यामुळे रहिमतबी व त्यांचा मुलगा हे दोघे डॉ. तोतला मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल येथे गेले. तेथे जिलानी या मुलास खाल्लेले पचत नाही, त्याला उलटी होते असे सांगितले. तेंव्हा डॉ. तोतला यांनी जिलानी याला एक इंजेक्शन दिले. त्यावेळी जिलानी हा शुध्दीवर होता. त्यानंतर थोड्या वेळाने डॉ. तोतला यांनी जिलानी याच्या तोंडात एक नळी घातली. त्यावेळी त्याला त्रास होवू लागला. व तो हालचाल करू लागला. त्यावेळी डॉ. तोतला यानी जिलानी या मुलास पुन्हा एक इंजेक्यन दिले. त्यानंतर जिलानी हा बेशुध्द झाला. त्यानंतर डॉ. तोतला यांनी जिलानी याच्या तोंडातून नळी बाहेर काढली. व त्याला उचलून बाहेर आणले. व ॲम्बुलन्समध्ये घालून आधार हॉस्पिटल येथे पाठवून दिले. तेथे गेल्यावर काही मिनीटांनी तेथील डॉक्टरांनी तुमचा मुलगा जिलानी याचे निधन झाले आहे. असे सांगितले.

डॉ. तोतला यांनी रहिमतबी यांच्या परवानगीशिवाय जिलानी याला दोन इंजेक्शन दिले व जिलानी या मुलाच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. या प्रकरणी डॉ. नवीन तोतला याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास महिला फौजदार व्हट्टे करित आहेत.

# दारू पिऊन झालेल्या भांडणात युवकाचा खून?

✔ **सोलापूर** : दारू पिताना झालेल्या भांडणात काठीने मारहाण केली. त्यानंतर हा युवक घरी जावून झोपला असता त्यातच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर या युवकाच्या कुटूंबियांनी खून असल्याचा आरोप केला. हा सारा प्रकार बाळे येथे गुरूवारी घडला.

या बाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, बाळे येथे राहणारा लखन रघूनाथ गायकवाड वय २४ हा व त्याचा मित्र कोळेकर हे दोघे गुरूवारी दुपारी दारू पिण्यासाठी गेले होते. दारूच्या नशेत त्या दोघांमध्ये जुन्या वादातून भांडणे झाली. यावेळी रागाच्या भरात कोळेकर याने लखन गायकवाड याला काठीने बेदम मारहाण केली. यानंतर लखन हा जखमी अवस्थेतच घरी जावून झोपला. गुरूवारी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास लखन याच्या कुटूंबियांनी लखन याला जेवण करण्यासाठी उठविण्याचा प्रयत्न केला. पण त्यावेळी त्याची हालचाल होत नव्हती. तेंव्हा डॉक्टरांना बोलावून घेतले त्यावेळी डॉक्टरांनी लखन मरण पावल्याचे सांगितले. या बाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिलीप शिंदे यांनी वरील माहितीला दुजोरा दिला. पोलिस निरीक्षक विकास देशमुख या घटने बाबत म्हणाले मृत लखन गायकवाड याच्या शरीरावर काठीने मारल्याचे वळ आहेत. त्यामुळे लखन याचा खून झाला असावा.

# मार्डीच्या श्री यमाई मंदिरात दक्षिणा हिसकावण्याचा प्रकार

**पुजाऱ्याचा 'प्रताप'; भाविकांच्या श्रद्धेला हरताळ; भक्तांचा संताप**

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र मार्डी येथील श्री यमाई मंदिरात काल दूर्गाष्टमी निमित्त दर्शनसाठी जमलेल्या हजारो भक्तांपैकी काही भक्तांची दक्षिणा पुजारी हणमंत गुरव यांनी हिसकावून घेण्याचा प्रकार केला. पुजाऱ्याच्या या 'प्रतापा'मुळे भाविकांच्या श्रद्धेला जणू हरताळ फासण्याचा प्रकार झाला. या प्रकाराने भक्तांना संताप अनावर झाला. या संदर्भातील चित्रफित सर्वत्र व्हायरल होत असून या प्रकाराबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली जात आहे.

त्याचे झाले असे की, काल दूर्गाष्टमी असल्याने सोलापुरातील तेलगू भाषिकासंह



अन्य असे साधारण पंधरा ते वीस हजार भक्तगण दर्शनसाठी येथील श्री यमाई मंदिरात जमले होते. देवदर्शनावेळी ते मनोभावे आपली दक्षिणा येथे असलेल्या दक्षिणा पेटीत अर्पण करण्याचा प्रयत्न करीत होते.

मात्र, याच दरम्यान, येथे उपस्थित असलेला पुजारी हणमंत गुरव हा भक्तांना आपले दान दानपेटीत अर्पण करण्यासा विरोध करीत होता. भक्तांचा हाताला



झटके देत त्यांच्या हातामधून बळजबरीने दान काढून घेण्याचा प्रकार करत होता. त्याच्या या प्रतापावर काही भक्तगण संतापले. या संबंधितास जाब विचारण्याचा प्रयत्न झाला. तरीपण त्यांनी दान हिसकावण्याचा प्रकार गर्दी संपेपर्यंत सुरु ठेवल्याचे अनेक भक्तांनी सांगितले.

> “ यमाई मंदिरातील दान पेटी धर्मदाय आयुक्तांनी सील केली असून ही पेटी त्यांच्या समक्ष व ट्रस्टी समोर खुली केली जाते. सोने,चांदी व रोख रक्कम व इतर वस्तू आलेलं आहे, याची सर्वासमक्ष नोंद घेतली जाते. पुढे काय करायचं हेदेखील ठरवते, ज्या पुजाऱ्याने हा प्रकार केला आहे तो गैर असून स्वत:ची गरज भागविण्यासाठी केलेला प्रकार आहे.मंदिर समितीचा आणि त्याने परस्पर दान हिसकावून घेण्याचा संबंध नाही.
>
> **– रंगनाथ गुरव,** अध्यक्ष मंदिर समिती

# अंगणातील फरशी फोडल्याने बांबूने मारहाण

**चौघांवर गुन्हा**

✔ **सोलापूर** : तु बांधकाम करताना माझ्या अंगणातील फरशी का फोडली या कारणावरून दिनेश गुराखे याला बांबूने मारहाण केल्याप्रकरणी अमोल गुराखे, सविता गुराखे, जगु स्यासम, हुलगम्मा बाबू मच्छल सर्व रा. जयशंकर तालीम, मोदीखाना या चौघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी दिनेश सिद्राम गुराखे वय २९ रा. जयशंकर तालीम, मोदीखाना याने सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. दि. ६ मे रोजी १२.१५ वाजण्याच्या सुमारास दिनेश गुराखे व त्याची आई मिनाक्षी हे घरासमोर झापले होते. त्यावेळी वरील चौघांनी दिनेश याला, तु बांधकाम करताना माझ्या अंगणातील फरशी का फोडली. असे म्हणून शिवीगाळ करून दिनेश गुराखे याला बांबूने मारहाण केली. तेंव्हा दिनेश याची आई मिनाक्षी ही भांडण सोडविण्यासाठी आली त्यावेळी तिला सुध्दा शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. या फिर्यादी वरून अमोल गुराखे सह चार जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास पोलिस नाईक माडे हे करित आहेत.

# प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी दोघांना ६ महिने कारावास

✔ सुराज्य/सोलापूर

मागील भांडणाचा राग मनात धरून जहांगीर सिंदगीकर सह तिघांवर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी बंदगी हुसेनसाब सिंदगीकर (वय ३६ रा. सिध्देश्वर पेठ) व मेहबुब शब्बीर बागवान (वय ३५ रा. मजरेवाडी) या दोघांना, अतिरिक्त सत्र न्यायाधीश रेखा पांढरे यांनी ६ महिने कारावासाची शिक्षा सुनावली.

स्वत:च्या फर्निचरच्या दुकानात अबुताला जहांगीर सिंदगीकर हा दि. १४ सप्टेंबर २०२१ रोजी बसला होता. त्यावेळी सायंकाळी ५.३०च्या सुमारास, मागील भांडणाचा राग मनात धरून बंदगी व मेहबुब हे दोघे दुकानासमोर आले. व शिवीगाळ करू लागले. त्यावेळी अबुतालाचा मोठा भाऊ अबुबकर हा तेथे आला. त्यावेळी बंदगी व मेहबुब यांनी त्याला सुध्दा शिवीगाळ केली. त्यावेळी बंदगी हा अबुतालाच्या वडिलांना उद्देशून जहांगीरया बाहर आ तुझे दिखाता असे म्हणत होता. त्यावेळी जहांगीर हा बाहेर आल्यानंतर लोखंडी रॉड त्यांच्या



डोक्यात घालून मारहाण केली. यावेळी अबुताला याला सुध्दा मारहाण करण्यात आली. अशा आशयाची फिर्याद अबुताला जहांगीर सिंदगीकर याने फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दाखल केली. यावरून बंदगी व मेहबुब या दोघांविरूध्द गुन्हा दाखल झाला. या प्रकरणी पोलिसांनी तपास करून आरोपींविरूध्द कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले.

हा खटला अतिरिक्त सत्र न्यायाधीश रेखा पांढरे यांच्या कोर्टात चालला. या खटल्यात सरकारच्यावतीने जखमी, नेत्र साक्षीदार, डॉक्टर यांच्यासह ७ साक्षीदार तपासण्यात आले. यावेळी न्यायाधीशांनी दोन्ही बाजुंच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून आरोपी बंदगी सिंदगीकर व मेहबुब बागवान या दोयांना ६ महिने कारावासाची शिक्षा सुनावली. तर जखमींना प्रत्येकी ५ हजार रूपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला.

या सरकारच्या वतीने ॲड. अल्पना कुलकर्णी यांनी तर फिर्यादीच्या वतीने ॲड. मिलींद थोबडे, ॲड. सतिश शेटे यांनी तर आरोपींच्यावतीने ॲड. एम. ए. इनामदार यांनी काम पाहिले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तो माझा डीपफेक व्हिडिओ होता !!

कल्याण
568-96-457

मुंबई
345-20-127

# चार दिवसात उजनीचे पाणी पोहोचणार औज बंधाऱ्यात

✔ सुराज्य/सोलापूर

**कोणत्याही क्षणी उजनी धरणातून तिबार पंपींगद्वारे पाण्याचा उपसा सुरु करण्यात येईल. त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा सज्ञ ठेवली आहे. उजनी धरणातून भीमा नदीपात्रात सोडलेले पाणी चार दिवसांत औज बंधाऱ्यात पाणी पोहोचेल, अशी माहिती महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.**

- सहा हजार क्यूसेकने सोडले नदीत पाणी
- कोणत्याही क्षणी तिबार पंपींगद्वारे पाणी उपसा होणार

सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून सोडलेले पाणी पंढरपूर ओलांडून पुढे आले आहे. १० मे रोजी पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. सध्या सहा हजार क्यूसेकने पाणी नदीत सोडले जात आहे. हे पाणी चार दिवसांत औज बंधाऱ्यात पोहोचेल. औज आणि चिंचपूर हे दोन्ही बंधारे साडेचार मिटरपर्यंत भरुन घेतले



जातील. पाऊस पडेपर्यंत हे पाणी पुरेल, असे व्यंकटेश चौबे यांनी स्पष्ट केले. सध्या औज बंधारा कोरडा असला तरी चिंचपूर बंधाऱ्यात आणखी सहा फूट पाणी आहे. २० मे पर्यंत हे पाणी पुरेल. हिप्परगा तलावातील उपलब्ध

### तिबार पंपींगसाठी १.३१ कोटी रुपये खर्च येणार

उजनी धरणातील पाण्याची पातळी वजा ५२ वर पोहोचली असून कोणत्याही क्षणी सोलापूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी तिबार पंपींग सुरु करण्यात येईल. या कामाचा मक्ता नाशिक येथील बडगुजर कंपनीला दिला आहे. त्यासाठी महापालिकेने एक कोटी ३१ लाख रुपये खर्च येणार आहे. सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. सध्या दुबार पंपींग यंत्रणा कार्यरत आहे.

पाण्याचा उपसा सुरु आहे. त्यामुळे शहराला तिव्र पाणीटंचाई भासली नाही. काही भागात पाणी पोहोचले नाही. अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणी देत आहोत, असेही चौबे यांनी सांगितले. सध्या दुबार पंपींग यंत्रणा कार्यरत आहे. त्यासाठी ८० लाख रुपये खर्च केले आहेत. हे कामदेखील बडगुजर कंपनीकडेच आहे. सध्या गाळमिश्रीत पाणी येत आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी तिबार पंपींग सुरु करावे लागेल. त्यासाठी १३५ अश्वशक्तीचे तीन पंप धरणाच्या ठिकाणी बसवण्यात आले आहेत, असे व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.